| MHKO140003942010 | नियमित दिवाणी दावा क्र. १२२/२०१०<br>**जानकू मारुती गावडे**<br>**वि.**<br>**गुंडू बापू गावडे व इतर** |
|---|---|

**<u>निशानी क्रमांक ५२ वरील आदेश</u>**

(दिनांक ०४/०१/२०२५)

प्रस्तुत अर्ज प्रतीवादी यांनी त्यांच्या विरुद्ध नि.क्र.१६ खाली पारित उलटतपास नाहीच आदेश रद्द होऊन वादीतर्फे साक्षीदार यांचा उलटतपास घेण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतीवादी यांचे थोडक्यात कथन असे की, वादी यांनी प्रस्तुत दावा वाटप होऊन स्वतंत्र कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी कैफियत सादर करून दाव्यास विरोध केला आहे. कोरोना विषाणू च्या प्रादुर्भावामुळे न्यायालयीन कामकाज बंद असल्यामुळे प्रतिवादी यांना वादीचे साक्षीदार यांचा उलटतपास नोंदविता आला नाही. त्यांनी जाणीवपूर्वक टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादी हे शेतकरी कुटुंबाचे सदस्य असून आर्थिकदुष्ठ्या मागास आहेत. त्यामुळे प्रतिवादी यांना तारखेवर हजर राहता आले नाही. तसेच त्यांचे विधिज्ञ यांना आवश्यक ती माहिती देता आली नाही. त्यामुळे प्रतिवादी यांचे विरुद्ध उलटतपास नाहीच आदेश झालेला आहे. विलंबास सयुक्तिक कारण आहे. प्रस्तुत प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी प्रतिवादी यांचे साक्षीदार यांचा उलटतपास घेणे न्यायाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. उलटतपास नाहीचा आदेश रद्द होऊन वादी यांना प्रतिवादी यांचे साक्षीदार यांचा उलटतपास घेण्याची परवानगी मिळणे आवश्यक आहे. अर्ज मंजूर न झाल्यास प्रतिवादी यांचे नुकसान होणार

आहे, याउलट अर्ज मजूर झाल्यास दावा गुणवत्तेवर निकाली निघणार आहे. करिता प्रस्तुतचा अर्ज.

३. प्रतिवादीतर्फे सुविद्य विधीज्ञ यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे सादर केले आहे आणि असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांनी जाणीवपूर्वक वादी यांचे साक्षीदाराचा उलटतपास घेतलेला नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. अर्ज मंजूर केल्यास जास्तीचा खर्च बसवण्याची विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचे सुविद्य विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

## कारण मिमांसा

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरण वादी यांनी वाटप होऊन स्वतंत्र कब्जा, व मनाई हुकुम मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रकरण वादी यांचे उलटतपास या टप्प्यावर प्रलंबित असताना प्रतीवादी यांनी वादी यांचे साक्षीदार (**पुरावा प्रतिज्ञालेख दिनांक १५.०१.२०१६ निशाणी क्र.१६**) यांचा उलटतपास पुरेसी संधी असून देखील नोंदविला नाही, त्यामुळे दिनांक ०२.०८.२०२३ रोजी उलट तपास नाहीच आदेश पारित झाला आहे. कोरोणा कालावधी वगळता, प्रतीवादी यांनी उलटतपास घेण्यास विलंब केल्याचे दिसून येते. तसेच रोजनामा वरून बरेच तारखेस वादी आणि प्रतिवादी गैरहजर असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रतिवादी यांनीच विलंब केला आहे असे म्हणता येणार नाही. अर्ज सादर करण्यास विलंब केला या एकमेव कारणावरून प्रतीवादी यांना वादी यांचे साक्षीदार यांचा उलटतपास घेण्याची संधी नाकारता येणार नाही.

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी वाटप होऊन ताबा मिळण्यासाठी आणि कायमस्वरुपी मानईहुकूम मिळणेसाठी दावा दाखल असून दोन्ही पक्षांचे अचल संपती बाबत निर्णय होणार आहे. तसेच साक्षीदार यांनी केलेल्या कथनाची सत्यता पडताळून पाहण्यासाठी दुसऱ्या बाजूस उलटतपास घेण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. वादी तर्फे साक्षीदार नं.१ यांचा उलटतपास नोंदविण्यात आलेला नाही. प्रकरणात प्रतिवादी यांनी विलंब केलेला असला तरीही भविष्यात तांत्रीक मुद्द्यावर प्रकरण पुन्हा चालविणेसाठीची शक्यता टाळण्यासाठी तसेच साक्षीदार यांच्या कथनांची सत्यता पडताळणीसाठी, प्रतीवादी यांना उलटतपास घेण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर झाल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यास मदत होणार आहे. तसेच प्रतिवादी यांनी प्रकरणात केलेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर खर्च बसविणे जरुरी आहे. सबब. विलंबाचा कालावधी पाहता प्रतिवादी यांच्या विरुध्द र.रु.१०००/– खर्च बसविणे योग्य राहिल.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुत अर्ज र.रु.१०००/– खर्च बसवून मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतीवादी यांनी खर्चाची रक्कम वादी यांना द्यावी आणि आज अथवा पुढील तारखेस साक्षीदार क्र.१ यांचा न चुकता उलटतपास नोंदवावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by WAMAN DIGAMBAR JADHAV
Date: 2025.01.04 16:59:13 +0530

दिनांक–०४/०१/२०२५ (वामन दि. जाधव)

चंदगड. सह दिवाणी न्यायाधिश, क. स्तर,

चंदगड (J.O. Code– MH 003143)